ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १३ जून, १९५१. अंक २४

## विविध माहिती

**उत्तर प्रदेशांत सिमेंटचा कारखाना**—उत्तर प्रदेश सरकारच्या स्वतःच्या मालकीचा सिमेंटचा कारखाना १९५२ सालीं प्रत्यक्ष उत्पादन करूं लागेल असें समजतें. कारखाना उभारण्यासाठीं एकूण सुमारें ३ कोटी रुपये भांडवल लागेल आणि त्यांत दररोज ७०० टन सिमेंट तयार होईल. भारताच्या मोठ्या उद्योगधंद्यांपैकीं सिमेंटचा सरकारी मालकीचा कारखाना हा पहिलाच आहे.

**उदयपूरचा आगपेट्यांचा धंदा**—उदयपूरमधील आगपेट्यांच्या धंद्याचें पुनरुज्जीवन करण्याच्या एका योजनेचा राजस्थान सरकार विचार करीत आहे. शहरांतील कारखान्याला लांकूड पुरविण्याची व्यवस्था झाली असून इतर कोणत्या सवलती देतां येतील त्यासंबंधीं विचार चालू आहे.

**गोकाकला लाखेची धंदे-शाळा**—१९४९ सालीं बेळगांव जिल्ह्यांतील गोकाक ह्या गांवीं लाखेच्या धंद्याचें शिक्षण देणारी एक शाळा मुंबई सरकारनें काढली होती. ही शाळा १९५२ च्या फेब्रुआरीपर्यंत चालूं ठेवण्याचें ठरविण्यांत आलें आहे. ह्या शाळेंत दाखल होणाऱ्या शहरांतील मुलांना दरमहा २५ रुपये आणि खेड्यांतील मुलांना दरमहा ३० रुपये शिष्यवृत्तीदाखल देण्यांत येतात.

**शेतकऱ्यांना ट्रॅक्टर्स घेण्यासाठी कर्ज**—मध्य-भारत सरकारनें शेतकऱ्यांना कर्जाऊ देण्यासाठीं म्हणून १५ लाख रुपये मंजूर केले आहेत. ह्या रकमेचा उपयोग ट्रॅक्टर्स विकत घेणें, विहिरी खणणें, पाटबंधाऱ्यांची दुरुस्ती करणें आणि खत विकत घेणें इत्यादी कामासाठीं करावयाचा आहे. एप्रिल, १९५१ अखेर मध्य भारतांतील २६,००० एकर पडीक जमिन ट्रॅक्टर्सच्या साह्यानें लागवडीखालीं आणली गेली आहे.

**हैदराबाद संस्थानला फॅक्टरी ॲक्ट लागू**—ता. १ एप्रिल, १९५१ पासून हैदराबाद संस्थानमध्यें मध्यवर्ती सरकारनें १९४८ चा फॅक्टरी ॲक्ट लागू केला आहे असें समजतें. ज्या कारखान्यांतुन औद्योगिक शक्तीचा उपयोग केला जातो आणि ज्यांत १० किंवा अधिक कामगार खपतात त्या कारखान्यांना वरील कायदा लागू होतो. तसेंच, २० कामगारांपेक्षां अधिक कामगार असलेल्या इतर कारखान्यांनाही तो लागतो. कायद्यांत निर्दिष्ट केलेल्या कामगारांच्या संख्येपेक्षां कमी कामगार असल्यासहि कायदा लागू करण्याची सत्ता संस्थान-सरकारला देण्यांत आली आहे.

**मद्रास सरकारला खाजगी संस्थेची मदत**—मद्रास प्रांतांतील अन्नाची टंचाई अंशतः दूर करण्यासाठी म्हणून अमेरिकेंतील एका खाजगी संस्थेनें खाद्य-पदार्थांच्या दोनशे पिशव्या मद्रास सरकारकडे पाठविल्या आहेत. आणखीही कांहीं पिशव्या पाठविण्यांत येणार आहेत. ह्या पिशव्यांतून तांदूळ, आटा, साखर, एवढे पदार्थ एका माणसाला एक वेळ पुरतील इतके असतात. ज्या भागांत अन्नाची विशेष चणचण असेल तिकडे हें अन्न आधीं रवाना करण्यांत येणार आहे.

**ब्रिटनची रशिआला निर्यात चालूच**—गेल्या १५ महिन्यांत ब्रिटननें रशिआला ६४,००,००० पौंड किंमतीची विजेची यंत्रसामुग्री निर्यात केली. चालू सालच्या पहिल्या तीन महिन्यांत ब्रिटननें रशिआला ४,०६१ टन रबरहि निर्यात केलें. ह्याच काळांत मलायाहूनहि रशिआनें १४,४२५ टन रबर आयात केलें. ब्रिटनला पूर्व-युरोपांतील देशांकडून लाकूड आणि कमी प्रतीचें धान्य ह्यांची आयात करावी लागते. म्हणून इतपत व्यापारी संबंध राखणें ब्रिटनला भागच पडतें. युद्धोपयोगी माल मात्र रशिआला न पाठविण्याची दक्षता घेण्यांत येत आहे.

**तेल कंपनीचे नोकर हलू लागले**—इराणनें तेलाच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करण्याचें ठरविल्यामुळें अँग्लो-इराणिअन कंपनीच्या परदेशी नोकरांची पंचाईत झाली आहे. ह्या परदेशी नोकरांच्या १०० कुटुंबांना इराण सोडून जावें लागणार आहे. त्यांच्यापैकीं पहिली तुकडी नुकतीच मुंबईला आली. त्यांत बहुतेक स्त्रिया आणि मुलें होतीं.

**अमेरिकेचें मोटारींचें उत्पादन**—अमेरिकन सरकारनें मोटारींच्या उत्पादनावर निर्बंध घालण्याचें ठरविलें आहे. जुलै ते सप्टेंबर १९५१ ह्या मुदतींत फक्त १२,००,००० मोटारी निर्माण करण्यांस परवानगी देण्यांत आली आहे. गेल्या वर्षी ह्याच तिमाहींत १९,००,०००मोटारी तयार करण्यांत आल्या होत्या. तथापि, नवीन निर्बंधामुळें हलक्या वजनाच्या मोटारींच्या निर्मितीला निर्बंध घालण्यांत आलेले नाहींत.

**बंगाली बोलपट कंपन्यांना तोटा**—१९५० सालीं बंगालमधील बोलपट निर्मात्यांना २५ लाख रुपये तोटा आला. एकूण बंगाली ४३ बोलपट काढण्यांत आले त्यांपैकीं फक्त १२ बोलपटांना आपल्या उत्पादनाच्या किंमतीपेक्षा थोडें जास्त उत्पन्न झालें. सरकारच्या मदतीनें शैक्षणिक चित्रपट काढून ते शिक्षण संस्थांतून दाखविण्यांत यावेत अशी सूचना बंगालच्या बोलपट-संघाचे अध्यक्ष श्री. चतर्जी ह्यांनीं केली आहे.

वेस्टर्न इंडिया लाइफ अश्युरन्स कं. लि.—या कंपनीनें गेल्या वर्षी ११,५६२ नवी विमापत्रकें दिलीं. त्यांच्या विम्याच्या किंमतीची रक्कम २,६३,५१,२७९ रुपये होते. नव्या विमा-पत्रकांच्या हप्त्याचे उत्पन्न १३,४३,८४१ रुपये झालें. एकच हप्ता भरून घेतलेल्या विमा-पत्रकांच्या हप्त्याचें उत्पन्न १८,६५५ रुपये झालें. गेल्या वर्षी कंपनीच्या विमानिधींत ५१,३०,४१७ रुपयांची भर टाकण्यांत आली. आतां एकूण विमानिधी ४,६६,९८,६७४ रुपये आहे. कंपनीनें भागीदारांना २५ टक्के नफा वाटण्याचें ठरविलें आहे.

पाकिस्तानच्या वेळेंत बदल—पाकिस्तान सरकारनें आपल्या वेळेंत ता. १ ऑक्टोबर, १९५१ पासून बदल करण्याचें ठरविलें आहे. प. पाकिस्तानमधील वेळ ग्रिनिच मीन टाइमपेक्षां ४॥ तास पुढें ठेवण्यांत येणार असून पूर्व पाकिस्तानमधील वेळ ६ तास पुढें ठेवण्यांत येणार आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाची सभा—संयुक्त राष्ट्रसंघाच्या जनरल असेंब्लीची सभा पॅरीसमध्यें ता. ६ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे, असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.

पाकिस्तानची साखरेची आयात—पाकिस्तान सरकारनें परदेशांतून ४०,००० टन साखर आयात करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकीं ९,००० टन साखर क्यूबाहून येणार असून, १२,००० टन ब्रिटनहून येणार आहे.

कृत्रिम रबराचा सर्वांत मोठा कारखाना—अमेरिकेंत जर्मनींतील सर्वांत मोठा कृत्रिम रबर तयार करण्याचा कारखाना आहे. प. व्हर्जीनिआंतील हा कारखाना आतां पुन्हां चालू करण्यांत आला आहे. १९४७ सालापासून तो बंद ठेवण्यांत आला होता. कारखाना दर वर्षी ९० हजार टन कृत्रिम रबर तयार करूं शकेल.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— नवीन हंगामाची —

चाळीस लक्ष रुपयांची साखर तयार झाली

१५ जूनपर्यंत आणखी साखर तयार होईल.

साडेपांच लक्ष रुपये किंमतीची साखर विकण्याचा सरकारी हुकूम झाला आहे.
परंतु रोख रक्कम मिळण्यास एक महिना लागेल.

३० जून १९५१ पर्यंत
६ टक्के व्याजानें एक वर्ष मुदतीच्या ठेवी कंपनी स्वीकारील

★ शेअर-विक्री सुरू आहे ★

शेअर व ठेवीचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

★ ठेवीची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

दि. ४ जून १९५१.
कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल्. बी.,
सी. जी. आगाशे अ‍ॅण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. १३ जून, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## उत्पादनवाढीसाठीं भांडवलाची पुनर्रचना

### टाटांचें डिफर्ड शेअर भांडवल

टाटा आयर्न अँड स्टील कं. लि. च्या डायरेक्टर बोर्डानें गेल्या आठवड्यांत कंपनीच्या कांहीं प्रमुख भागीदारांची एक खासगी सभा बोलाविली होती. त्या सभेचा उद्देश, टाटा कंपनीच्या डिफर्ड भागांचें ऑर्डिनरी भागांत रूपांतर करण्याचा प्रश्न सोडविण्याचा पुनः प्रयत्न करणें, हा होता. १९४१ सालापासून असे प्रयत्न चालू होते, ते सर्व अयशस्वी झाले. एका वेळीं, प्रत्येक डिफर्ड भागास ५½ ऑर्डिनरी भाग देऊं करण्यांत आले होते, परंतु कांहीं डिफर्डवाल्यांना जास्त प्रमाणांत ऑर्डिनरी भाग हवे होते. ऑर्डिनरी शेअरवाले १ डिफर्ड = ४½ ऑर्डिनरी असें प्रमाण ठरवून मागत आहेत. टाटा कंपनीची उत्पादनशक्ति वाढविण्यासाठीं तिला भारत सरकारकडून कर्ज हवें आहे. १० कोटी रुपयांचें हें कर्ज मंजूर करण्यापूर्वी कंपनीनें आपल्या डिफर्ड भागांचें ऑर्डिनरी भागांत रूपांतर केलें पाहिजे, अशी सरकारची अट आहे. सरकारी कर्ज मिळण्याची शक्यता आतां निर्माण झाली असल्याकारणानें, टाटा कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें भांडवलाच्या पुनर्रचनेचा पुनः प्रयत्न चालविला आहे. डिफर्डचें ऑर्डिनरी भागांत कोणत्या तत्त्वानें रूपांतर करावें, हें ठरविण्यासाठीं भारताचे अॅडव्होकेट जनरल श्री. एम. सी. सेटलवाड ह्यांची पंच म्हणून नेमणूक योजना करावी, असें गेल्या आठवड्यांतील सभेनें मान्य केलें आहे. अर्थात्, श्री. सेटलवाड ह्यांचा निवाडा भागीदारांवर कायदेशीरपणें बंधनकारक होणार नाहीं, परंतु ह्या निवाड्यानें पुढील वाटाघाटी सुलभ होतील ह्यांत संशय नाहीं. कंपनीच्या मालमत्तेचें मापन, पूर्वी दिलेलें डिव्हिडंड, कंपनीची पुढें उत्पन्न मिळविण्याची क्षमता, इत्यादि बाबी लक्षांत घेऊनच पंचानें निवाडा करावयाचा आहे.

टाटा कंपनीच्या आर्टिकल्स ऑफ असोसिएशननें डिव्हिडंड वाटण्याची पद्धति ठरवून दिलेली आहे. प्रथम प्रेफरन्स शेअर्सना ठराविक डिव्हिडंड, नंतर ऑर्डिनरी शेअर्सवर ८% डिव्हिडंड, नंतर डिफर्ड शेअर्सवर २५% डिव्हिडंड आणि ही वाटणी झाल्यानंतर उरलेल्या सर्व नफ्याची डिफर्ड व ऑर्डिनरी भागांत सम प्रमाणांत वाटणी, अशी ती योजना आहे. प्रत्येक डिफर्ड शेअरच्या पोटीं ३० रु. वसूल केलेले आहेत, तर ऑर्डिनरीचे ७५ रु. वसूल केलेले आहेत. म्हणजे ४८,७५० डिफर्ड शेअर्सचे पोटीं कंपनीकडे १४,६२,५०० रु. जमा आहेत, आणि ३,५०,००० ऑर्डिनरी शेअर्सचे पोटीं २,६२,५०,००० रु. जमा आहेत. कमी वसूल झालेल्या डिफर्ड शेअर्सना ऑर्डिनरी शेअर्सच्या मानानें अप्रमाण रक्कम डिव्हिडंड म्हणून वाट्यास येते. उदाहरणार्थ, सर्व डिफर्ड भागांस मिळून गेल्या वर्षी ३८,५१,२५० रु. मिळाले, तर ऑर्डिनरी भागांस फक्त २६,२५,००० रु. एवढीच रक्कम मिळाली.

कंपनीच्या आर्थिक प्रगतीस डिफर्ड शेअर्सचें अस्तित्व कितपत पोषक ठरलें आहे, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ऑर्डिनरी शेअर भांडवलपेक्षा डिफर्ड शेअर भांडवल अगदीच कमी आहे. कांहीं काळ डिफर्डवाल्यांना मुळींच डिव्हिडंड मिळालेलें नाहीं हें खरें आहे, परंतु त्यापैकीं बरींच वर्षें ऑर्डिनरीवाल्यांसहि डिव्हिडंड मिळूं शकलेलें नाहीं. उदाहरणार्थ, १९२१ ते १९३५ ह्या चौदा वर्षांत डिफर्ड शेअर्सवर एकदांहि डिव्हिडंड जाहिर झालें नाहीं, परंतु ह्या चौदांपैकीं फक्त दोनच वर्षी ऑर्डिनरी भागांच्या वाट्यास डिव्हिडंड आलें. डिफर्ड शेअर्स कंपनीच्या नफ्याचा फार मोठा अंश उचलीत असल्याकारणानें, आर्टिकल्स आहेत तशीच कायम ठेवला तर पुरेसें ऑर्डिनरी शेअर भांडवल नव्यानें उभारणें कंपनीस शक्य होणार नाहीं. नव्या ऑर्डिनरी भाग भांडवलाच्या मदतीनें उत्पादन व नफा हीं वाढलीं तरी डिफर्ड शेअरवाल्यांनाच त्याचा मोठा फायदा मिळणार. कांहीं डिफर्ड शेअरवाल्यांच्या वैयक्तिक नफ्यासाठीं कंपनीची वाढ स्थगित होणें केव्हांहि हितावह नाहीं. टाटांच्या पोलादाच्या कारखान्याचें औद्योगिक व लष्करी दृष्टीनें फारच मोठें महत्त्व आहे. म्हणूनच डिफर्डवाल्यांची अडगळ दूर करण्याचा प्रयत्न चालू आहे. गेल्या आठवड्यांतील सभेचा निर्णय ह्या दृष्टीनें आशादायक आहे. भारतांतील ह्या अत्यंत महत्त्वाच्या कारखान्याची उत्पादनक्षमता वाढवण्याचे मार्गांतील अडचणी त्वरित दूर होणें अगत्याचें आहे. भागीदारांनीं समजूतदारपणानें भांडवलाच्या पुनर्रचनेचा प्रश्न सोडविला नाहीं, तर सरकारला सक्तीचा मार्ग अवलंबावा लागेल आणि तो कदाचित् ज्यास्तच अडचणी निर्माण करणार नाहीं कशावरून ? शेअर भांडवलाची पुनर्रचना केली नाहीं, तर पोलादाच्या धंद्यास दिलेलें संरक्षण टारिफ बोर्ड काढून घेईल, अशी भीति कंपनीच्या एका अधिकाऱ्यानें व्यक्त केली. ती साधार नसली, तरी ह्या प्रश्नाची गुंतागुंत समजून येण्यास पुरेशी आहे.

**टेनिसपटु आचारी बनला**—ओवेन विल्यम्स नांवाच्या आफ्रिकन टेनिसपटुला विंबलडन येथील टेनिसच्या सामन्यांत भाग घेण्यासाठीं इंग्लंडला जावयाचें आहे. परंतु भाड्याचे पैसे नाहींत म्हणून तो अडचणींत होता. अखेर २१ वर्षांच्या ह्या तरुणानें एका आगबोटींत आचाऱ्याचें काम करून इंग्लंडला जाण्याचें ठरविलें आहे.

**अहिल्याबाई होळकरांचें स्मारक**—अहिल्याबाई होळकरांच्या स्मारकाप्रीत्यर्थ बांधण्यांत यावयाच्या इमारतीचा कोनशिला समारंभ मध्य भारताचे पंतप्रधान श्री. जैन ह्यांच्या हस्तें नुकताच करण्यांत आला. ह्या भागांतील स्त्रियांच्या सांस्कृतिक प्रगतीसाठीं इमारतीचा उपयोग करण्यांत येणार आहे.

**जपानसाठीं हिंदी गायी**—भारत आणि जपानमधील जनतेंतील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठीं श्री. जे. के. बिर्ला ह्यांनीं एक हत्ती, दोन गायी आणि एक बैल जपानला भेट म्हणून देण्याचें ठरविलें आहे. गायींचीं नांवें, 'कल्याणी' व 'नंदिनी' अशीं ठेवण्यांत आलीं आहेत. हत्तीचें नांव 'सुखमंगळ' आहे.

## मुंबई राज्यांतील हातमाग व त्यावरील कापड

### हातमागांची संख्या व त्यावर तयार होणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या कापडाची छाननी

| जिल्हे | साड्या व लुगडे | कोटिंग | शर्टिंग इ. | हातरुमाल वगैरे | धोंगड्या व शोरे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| पश्चिम खानदेश | २३६४ | १० | ६ | ४६ | ६५ | २४९१ |
| पूर्व खानदेश | ६१९० | १९ | ८ | १९ | १४७ | ६३८३ |
| नासिक | ८००६ | ९ | ५४ | २१४० | ८२ | १०२९१ |
| अहमदनगर | २८४८ | ७९ | १८७ | ३१३ | ११५९ | ४५८६ |
| पुणें | ९२९ | ९१ | ... | १८१ | ४९ | १२५० |
| सातारा | २०६४ | ... | ५५ | २०८ | ३ | २३३० |
| सोलापूर | १४०३३ | ३१ | १७१ | २१४६ | ७२ | १६४५३ |
| ठाणें | २२३५ | १४५ | ५० | १२७ | ३ | २५६० |
| कुलाबा | ७९ | ... | ... | ६ | ३ | ८८ |
| रत्नागिरी | १००३ | ... | ४ | ४ | ... | १०५२ |
| मुंबई व उपनगर | ४६३ | १४९ | ४५७ | १३२१ | ३३७७ | ५७६७ |
| महाराष्ट्र जिल्हे | ४०२५४ | ५३३ | ९९२ | ६५११ | ४९६० | ५३२५० |
| टक्केवारी | ७५.५० | १.०० | १.८६ | १२.२३ | ९.३१ | १००.०० |
| गुजराथ जिल्हे | १४२४ | १९८१ | ६२५ | ६४१९ | १३२७ | ११,७७६ |
| टक्केवारी | १२.०९ | १६.८२ | ५.३१ | ५४.५१ | ११.२७ | १००.०० |
| कर्नाटक जिल्हे | ३४,७५१ | ५४ | ३७२ | २५४७ | ५५४ | ३८२७८ |
| टक्केवारी | ९०.७९ | ०.१४ | ०.९७ | ६.६५ | १.४५ | १००.०० |
| एकूण बेरीज | ७६४२९ | २५६८ | १९८९ | १५४७७ | ६८४१ | १०३३०४ |
| टक्केवारी | ७३.९८ | २.४९ | १.९३ | १४.९८ | ६.६२ | १००.०० |

### उत्तर प्रदेशांतील ग्रामोद्योगांना उत्तेजन

उत्तर प्रदेश सरकारनें आपल्या राज्यांतील ग्रामोद्योगांना उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे. आर्थिक पुनर्घटनेच्या योजनेचाच हा एक भाग आहे. ग्रामोद्योगांतील केंद्रांत तयार झालेला माल बाजारांत मोठ्या कारखान्यांच्या मालाशी स्पर्धा करूं शकत नाहीं; म्हणून अशा मोठ्या कारखान्यांच्या मालावर थोडासा कर घेण्याची सूचना राज्याच्या मुख्य मंत्र्यांनीं केली आहे. त्यामुळें ग्रामोद्योगाच्या वस्तू बाजारांत खपण्यास मदत होईल असें त्यांचें म्हणणें आहे. त्याशिवाय पुढील कांहीं सूचनाहि त्यांनीं केल्या आहेत. मोठ्या कारखान्यांतून जो माल तयार होतो आणि जो ग्रामोद्योगाला लागतो, अशा मालापैकीं कांहीं भाग ग्रामोद्योगासाठीं शक्य व जरूर तेथें मुद्दाम राखून ठेवण्यांत यावा. उदाहरणार्थ, सुताच्या गिरण्यांनीं हातमागाला लागणाऱ्या सुताच्या उत्पादनांकीं कांहीं गांठीं राखून ठेवाव्या. राज्य-सरकारनें आपल्याला लागणाऱ्या वस्तू घेतांना ग्रामोद्योगांत तयार झालेल्या वस्तूंना प्राधान्य द्यावें. ग्रामोद्योगांपुढें असणाऱ्या प्रश्नासंबंधीं संशोधन करण्याची व्यवस्था सरकारनें करावी; त्याचप्रमाणें ग्रामोद्योगांत वापरण्यांत येणारीं यंत्रें सुधारण्यांत यावीं. राज्याचें उद्योगखातें खादीला चांगलें उत्तेजन देत आहेच. हेंच तत्त्व इतर ग्रामोद्योगांच्या बाबतींतहि अंमलांत आणण्यांत यावें. ग्रामोद्योगांत जीं यंत्रें वापरण्यांत येतात तीं आधुनिक पद्धतीचीं असल्याशिवाय माल चांगला निघत नाहीं; म्हणून आधुनिक पद्धतींचीं यंत्रें वापरण्यांत यावींत. ग्रामोद्योगाच्या केंद्रांत तयार होणारा माल एका दर्जाचा निघावा म्हणून उपाय योजण्यांत आलेले आहेतच. ग्रामोद्योगांचें शिक्षण देणाऱ्या केंद्रांची संख्या वाढविण्यांत यावी आणि तीं राज्याच्या सर्व भागांतून काढण्यांत यावींत; म्हणजे सर्व भागांना ग्रामोद्योगाचा सारखाच फायदा मिळेल. हीं केंद्रें चालविण्यास फारसा खर्च येत नाहीं आणि त्यांपासून ग्रामोद्योगाला चांगली चालना मिळते असा उत्तर प्रदेश सरकारचा अनुभव आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या ह्या धोरणाचा अनुभव लक्षांत घेण्यासारखा होईल, असें वाटतें.

### प्रकाशकांचा व लेखकांचा धंदा बिघडला

ब्रिटनमधील प्रकाशकांना व लेखकांना वाईट अवस्थेला तोंड द्यावें लागत आहे. चालू वर्षअखेर ब्रिटनमध्यें जीं पुस्तकें प्रसिद्ध होतील त्यांच्या किंमती १० टक्के वाढतील असा अंदाज करण्यांत आलेला आहे. पुस्तकांना लागणाऱ्या कागदाच्या पुरवठ्यावर नियंत्रण घालण्यांत आलेलें नाहीं. परंतु पुरवठाच अपुरा आणि फार महागाईच्या किंमतीचा झाला आहे. चांगल्या प्रकारच्या कागदाच्या कांहीं जाती तर मिळतच नाहींत आणि जो थोडा बहुत मिळतो त्याच्या किंमती १९३८ च्या मानानें पांचपट झालेल्या आहेत. पुस्तकें छापण्याचा खर्च युद्धपूर्वकाळाच्या मानानें १२५ टक्के वाढला आहे आणि बांधणीचा खर्च ३॥ पटीनें वाढला आहे. पुस्तकांच्या विक्रीच्या किंमती मात्र ह्या प्रमाणांत वाढविण्यांत आलेल्या नाहींत. ह्या परिस्थितींत लेखकांचीहि दैना उडाली आहे. प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या कांहीं फारशी कमी झालेली नाहीं. पण लेखकांना मिळणाऱ्या मोबदल्यांत घट झाली आहे. १९३८ सालीं कादंबरीचा प्रकाशक नव्या पुस्तकांची पहिली आवृत्ति १०,००० ची काढण्यास कचरत नसे. आतां तो फक्त ५,००० चीच आवृत्ति काढतो आणि त्यांतील ३,००० प्रतींचीच बांधणी करून घेतो. पुस्तक खपलें नाहीं, तर उरलेल्या न बांधलेल्या प्रतींचा कागदाच्या लगद्यासाठीं उपयोग केला जातो. प्रत्येक न बांधलेल्या प्रतीमागें प्रकाशकाचे ९ पेन्स वांचतात. एखाद्या लेखकाला एखाद्या गुंतागुंतीच्या विषयावर लिहिण्यास सांगावयाचें तर त्याची एक वर्षाची तरी तरतूद करावी लागते. असें करणें आतां बड्या प्रकाशकांखेरीज इतरांना शक्यच होत नाहीं. पूर्वी लेखकांना अशीं कामें बरींच मिळत असत. अशा परिस्थितींत तरुण होतकरू लेखकांची फार अडचण होऊं लागली आहे. कारण, प्रसिद्ध लेखकांनाच हल्लीं थोडेंबहुत काम मिळूं शकतें. प्रकाशकांना होणाऱ्या नफ्यांतहि घट झालेली आहे. अर्थातच, ग्रंथकारांशीं करार करतांना ते कमींतकमी मोबदला देण्यासाठीं घासाघीस करूं लागले आहेत.

### युनायटेड बँक ऑफ इंडिया लि.चीं एकत्रीकरणानंतरची प्रगति

६ नोव्हेंबर, १९५० रोजीं पश्चिम बंगालमधील चार शेड्यूल्ड बँकांचें एकत्रीकरण घडून आलें. कॉमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन लि., कॉमिल्ला बँकिंग युनियन लि., बेंगॉल सेंट्रल बँक लि. आणि हुगळी बँक लि. ह्या चार बँकांची युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. ही मोठी बँक बनली. तिचा ३१ डिसेंबर, १९५० अखेरचा म्हणजे पहिला ताळेबंद प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून तिचें वसूल भांडवल २ कोटी, ६४ लक्ष रु. व रिझर्व्हज् ३ कोटी, ६६ लक्ष रु. झाल्याचें दिसून येतें. ठेवींची रक्कम २६ कोटी, ९० लक्ष रु. आहे, रोख व इतर बँकांत चालू खात्यावर ४ कोटी, ४९ लक्ष रु. असून सरकारी रोख्यांतील गुंतवणूक १४ कोटी, ८३ लक्ष रुपयांची आहे. रिझर्व्ह फंडाकडे योग्य ती रक्कम वर्ग करून व कराची तरतूद करून १२,२८,१२४ रु. नफा उरला. १९५० सालअखेरीनंतर आतां ठेवींत २ कोटींची भर पडली आहे, असें रिपोर्टांत नमूद करण्यांत आलें आहे.

# कर भरणारास सवलती

दीर्घ मुदतीची तुंबलेली बरीच मोठी रक्कम एकदम भरतांना कर भरणाऱ्यांच्या अडचणी लक्षांत घेऊन ती भरण्याची एक सवलतीची योजना सुरू करण्यांत येत आहे. ही योजना अल्प मुदतीचीच असून त्यानुसार कर भरणारास भरावयाचा राहिलेला कर ३१ मार्च, १९५२ पर्यंत भरतां येत असल्यास तो ठरलेल्या हप्त्यानें भरतां येईल. या दरम्यानच्या काळांत सरकारनें जप्त केलेली कर भरणारांची मालमत्ता विकली जाणार नाहीं. या योजनेनुसार संबंधित प्राप्तीकर-अधिकाऱ्याकडे ३१ जुलै १९५१ पूर्वी अर्ज करावेत.

ठरलेला हप्ता वेळचेवेळीं भरल्यास कर न दिल्याबद्दल करण्यांत आलेल्या दंडांत संपूर्ण कर भरल्यावर परिस्थितीनुसार सवलत देण्यांत येईल अगर त्यांत सूट देण्यांत येईल. मात्र, उत्पन्न लपविल्याबद्दल करण्यांत आलेल्या दंडास ही सूट लागू नाहीं.

तसेंच या योजनेनुसार आणखीही कांहीं सवलती देण्यांत आल्या आहेत. प्राप्तीकर चौकशी मंडळानें निकालांत काढलेल्या प्रकरणांचे बाबतींत या सवलती देतां येणार नाहींत.

यासंबंधींचें अधिक स्पष्टीकरण प्राप्तीकर अधिकाऱ्याकडून मिळूं शकेल. आपण होऊन, आपण चुकविलेल्या कराबद्दल ३१ ऑगस्ट, १९५१ पूर्वी माहिती देणारांवर खटले भरण्यांत येणार नाहींत. दंड करतांना सर्व परिस्थितीचा विचार करतां येईल.

---

### मराठा चेंबरचे नवे अध्यक्ष

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या १९५१-५२ सालासाठी व्हावयाची निवडणूक नेहमीप्रमाणें अविरोध होणार आहे, असें दिसतें. अध्यक्ष (१) गं. ल. नातू, (माधवनगर कॉटन मिल्स लि.), उपाध्यक्ष (४) ग. रा. साठे, दा. वा. पोतदार, शं. ल. किर्लोस्कर व रा. ग. विजयकर (विश्वभारती इं. कं. लि.), खजिनदार (१) श्री. मराठे (भारत पेन्सिल्स लि.), कार्यवाह (२) आ. रा. भट, गो. द. आपटे, इतर सदस्य (१६) चं. गो. आगाशे, वि. म देवल, बा. गो. भागवत (ऑ. इं. मो. ट्रा. म्यु. इं. कं. लि.), शं. र. ठाकूर (ठाकूर सावदेकर कं.), म. स. पारखे (पेपर ॲण्ड पल्प कन्व्हर्शन्स लि.), पु. का. दिवेकर (स्वस्तिक टेक्स्टाइल्स मिल्स लि.), कृ. ह. ढमढेरे, वा. मो. शहा (सोलापूर मोटार ट्रॅन्स्पोर्ट लि.), व श्री. वैद्य (स्वस्तिक रबर प्रॉडक्टस), स. गो. पाध्ये (ओगले ग्लास वर्क्स लि.), श्री. म. जोशी व म. वि पुराणिक अशीं उमेदवारीचीं सूचनापत्रें आलीं आहेत.

---

### राजकन्येच्या स्वागताचें रहस्य

इंग्लंडमधील कोळशाच्या एका खाणीस प्रिन्सेस मार्गारेटनें भेट दिली, त्या वेळीं राजकन्येनें खाणीकामगारांबरोबर बातचीत केली. राजकन्येचें एवढ्या उत्साहानें का स्वागत करण्यांत आलें, ह्याचें रहस्य एका कामगारानें तिला सांगितलें. "आपल्या ह्या भेटीमुळें आम्हां सगळ्यांना जादा बीर फुकट वाटण्यांत येत आहे" असा त्यानें खुलासा केला.

---

### रशियांतील कंझ्यूमर्स सोसायट्यांत स्त्रियांचें काम

सोव्हिएट रशियांतील कंझ्यूमर्स सोसायट्यांची सभासद संख्या ३,२०,००,००० आहे. त्यांपैकीं निम्म्यापेक्षां अधिक स्त्रिया आहेत. लक्षावधि स्त्रिया ह्या सोसायट्यांच्या व्यवस्थाकार्यांत भाग घेतात आणि जबाबदारीच्या जागीं कामें करतात.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.** (स्थापना १९१८)

शाखा : १ दादर
१ माहीम
१ बेळगांव
१ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.

बचतीच्या विविध योजना

हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई.


### व्ही. पी. नें पाठविण्याच्या वस्तूंचा सक्तीचा विमा

भारत सरकारनें १ मे, १९५१ पासून २५ रुपयांहून अधिक किंमतीच्या व्ही. पी. नें पाठविण्याच्या वस्तूंचा विमा उतरविणें सक्तीचें केलें आहे, परंतु पुढील बाबतींत असा विमा उतरविणें सक्तीचें केलें जाणार नाहीं:—

(१) पुस्तकें, प्रकाशनें व दस्तऐवज असलेलीं व्ही. पी. पार्किटें.

(२) रेल्वेच्या पावत्या व अंगभूत किंमत नसलेले इतर दस्तऐवज असलेलीं व्ही. पी. नें पाठविलेलीं पत्रें—ज्यांचे नांवावर अशीं पत्रें पाठविलीं जातील त्यांचेकडून मग कितीही रक्कम वसूल करावयाची असो.

व्ही. पी. नें पाठविण्याच्या २५ रुपयांहून अधिक किंमतीच्या पार्सलांचा विमा उतरविणें आवश्यक आहे

---


## DECCAN INSTITUTE OF COMMERCE

594, Budhwar, Poona 2,

Classes for 1951-52 Session will begin on Wednesday the 20th June 1951. G. D. C., L. C. C. D Com., C A. (1st), G. D. C. & A., C. A. I. I. B., Shorthand, Typewriting Courses. Morning and Evening classes. Prospectus free on application to the Secretary.

---

## श्री. ना. दा. ठाकरसी कॉलेज, पुणें ४.

महिला विद्यापीठाच्या या कॉलेजची पहिली सहामाही दि. १५ जून १९५१ रोजीं सुरू होईल. त्याच दिवशीं वसतिगृह उघडेल.

एस्. एस्. सी परीक्षेंत खालील विषय घेऊन प्रत्येक विषयांत शें. ३५ गुण मिळविलेल्या विद्यार्थिनींना या कॉलेजमध्यें प्रथम वर्षांत प्रवेश मिळेल.

विषय;—(१) इंग्रजी (२) मातृभाषा (३) (अ) जनरल सायन्स (आ) फिजिक्स-केमिस्ट्री (इ) बॉटनी-झुऑलॉजी (ई) फिजियालॉजी-हायजीन यापैकीं कोणताहि एक विषय (४) इतिहास, हिंदुस्थानची राज्यव्यवस्था व नागरिकशास्त्र, भूगोल यापैकीं एक विषय.

वरील चार विषयांखेरीज एस्. एस्. सी. पैकीं कोणतेहि तीन विषय. एकूण सात विषय लागतात.

युनिव्हर्सिटि विषयांखेरीज इतर विषय घेऊन ज्या विद्यार्थिनी एस्. एस्. सी. पास झाल्या असतील त्यांचाहि कॉलेज प्रवेशाबाबत विचार केला जाईल. अधिक माहितीसाठीं ऑफिसमध्यें चौकशी करावी.

(वेळ- स. ८॥ ते ११)

बी. टी. क्लासमध्यें प्रवेश २० जूनपर्यंत मिळूं शकेल.

सौ. शरयू वाळ
प्रिन्सिपल.

# दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड, पुणें

मुख्य कचेरी : प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें २

शाखा : कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८१, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

दि. ३१ डिसेंबर १९५० रोजीची परिस्थिति दाखविणारी संक्षिप्त पत्रकें

## ताळेबंद

**भांडवल व देणें**

| भांडवल व देणें | | रु. आ. पै |
|---|---|---|
| मागणी केलेलें व वसूल झालेलें भांडवल | | ७,११,४८५-०-० |
| मागापोटी आगाऊ भरलेले | | २५,१२३-०-० |
| रिझर्व्ह फंड | | ९५,०००-०-० |
| रिझर्व्ह फॉर इन्व्हेस्टमेंट्स् | | १५,२००-०-० |
| डिव्हिडंड इ. फंड | | १४,६१५-७-२ |
| ठेवी व इतर खातीं | | ६४,१८,५३४-३-७ |
| बिल्स पेएबल | | २६,१४९-८-६ |
| बिल्स फॉर कलेक्शन | | ९९,०६४-७-१ |
| इतर लायाबिलिटीज | | |
| स्टाफ-प्रॉ. फंड | २५,२८४-१२-० | |
| मागणी न केलेलें डिव्हिडंड | ७,१२०-१५-६ | |
| ब्रँच अडजेस्टमेंटस | ८,३६७-०-९ | ४०,७७२-१२-३ |
| नफा-तोटा खातें | | |
| मागील ताळेबंदांतून पुढें ओढलेली रक्कम | १,२३०-६-५ | |
| १९५० चा निव्वळ नफा | ६०,६९१-११-३ | |
| | | ६१,९२२-१-८ |
| एकूण रु. | | ७५,१५,८६६-८-३ |

**जिंदगी व येणें**

| जिंदगी व येणें | रु. आ. पै |
|---|---|
| कॅश व रिझर्व्ह बँकेंत शिल्लक | ६,९०,४३०-३-१० |
| बँकांतून ठेवलेली शिल्लक | ७,९०,११७-७-४ |
| इन्व्हेस्टमेंटस् ( खरेदी किंमत ) प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांचे कर्जरोखे, ट्रस्टी सिक्युरिटीज, ( बाजारभावानें किंमत १९,६३,०७३-०-६ ) शेअर्स, नॅ. से. सर्टिफिकिटें व मुदती ठेव | २१,६५,३१६-१४-० |
| बिल्स परचेसड अँड डिस्कौंटेड | ३२,७००-०-३ |
| कर्जे, ॲडव्हान्सेस, कॅश केडिट्स आणि ओव्हरड्राफ्ट्स् | ३६,२६,११९-१-९ |
| बिल्स फॉर कलेक्शन | ९९,०६४-७-१ |
| बँक प्रिमायसेस | २०,०००-०-० |
| फर्निचर अँड फिक्चर्स | २३,९६०-०-० |
| लायब्ररी | ३९५-०-० |
| इतर ॲसेटस्-इनव्हेस्टमेंटवर साचलेलें व्याज, हातीं असलेलीं प्रिंटिंग व स्टेशनरी, प्रॉ. फंड इनव्हेस्टमेंटस्, इ. व टे. कंपन्यांकडील डिपॉझिटस्, आगाऊ भरलेला इन्कमटॅक्स, वसूल होण्याजोगे कोर्टखर्च | ६७,७६३-६-० |
| एकूण रु. | ७५,१५,८६६-८-३ |

## नफातोटा पत्रक

| खर्च | रु. आ. पै |
|---|---|
| ठेवींवर दिलेलें व्याज | १,३२,८०४-४-० |
| इतर बँकांकडील कर्जांवर व्याज | ३,१११-१-० |
| पगार व भत्ते वगैरे | ७१,७६९-१०-० |
| स्टाफ प्रॉ. फंडास कौंट्रिब्यूशन | २,७१३-०-० |
| डायरेक्टर्स फी व अलावन्सेस | ६,२२१-१०-० |
| लोकल कमिटी फी | ८५०-०-० |
| ऑडिटर्स फी | १,०००-०-० |
| भाडें, कर, विमा, दिवाबत्ती | ५,३४४-१२-० |
| स्टेशनरी, छपाई, जाहिरात | १६,२६४-११-० |
| टपाल, तारा, तिकिटें | २,८६५-६-८ |
| मालमत्तेची डागडुजी | १२-१४-० |
| ऑफिस खर्च | ९,४४२-७-३ |
| मालमत्तेवरील व फर्निचरवरील घसारा | २,२५७-८-६ |
| निव्वळ नफा | ६०,६९१-११-३ |
| एकूण रु. | ३,१५,३४८-१५-८ |

| जमा | रु. आ. पै |
|---|---|
| व्याज आणि डिस्कौंट | ३,०२,६२९-१५-११ |
| कमिशन, एक्स्चेंज आणि ब्रोकरेज | ९,९८२-१५-९ |
| भाडें | ७२०-०-० |
| इनव्हेस्टमेंट विक्रींत नफा | १७५-०-० |
| ट्रान्स्फर फीज | ५३-८-० |
| इतर | १,७८७-८-० |
| एकूण रु. | ३,१५,३४८-१५-८ |

सी. टी. चितळे<br>मॅनेजिंग डायरेक्टर

जी. आर. साठे चेअरमन

डी. जी. बापट व्हाइस-चेअरमन

जी. डी. जोगळेकर<br>मॅनेजर

सी. जी. जोशी<br>अकौंटंट

एस. एम. जोशी<br>डब्ल्यू. पी. वैद्य<br>एल. आर. घडफळे<br>जी. यू. चितळे<br>एल. एम. जोशी<br>एम. एम. गद्रे<br>एस. जी. केणी<br>डायरेक्टर्स

वी. सी. अभ्यंकर अँड कं.<br>चार्टर्ड अकौंटंटस्

## चतुष्पाद नटांचे पगार

अमेरिकेंतील सिनेमा नट–नटयांचे लठ्ठ पगार कुतुहलाचे विषय झालेले आहेत. परंतु ह्या सृष्टींत वावरणाऱ्या मुक्या प्राण्यांना रजतपटावर काम करण्यासाठी किती वेतन मिळतें ह्यासंबंधीं माहिती उपलब्ध नसते. त्यांच्या वेतनाचे आंकडे पाहिले तर कित्येक जणांना प्राणि–सृष्टींत प्रवेश करावासा वाटेल, असे विनोदी उद्‌गार एका अमेरिकन लेखकानें काढले आहेत. जॉन वॉल्टर्स ह्या लेखकानें प्राणिकोटींतील नटांच्या वेतनाची गमतीदार हकीकत नुकतीच प्रसिद्ध केली आहे. ‘ बिंगो ’ नांवाचा एक चिंपाझी वानर आहे. त्याला पियानो वाजवितां येतो आणि सायकलवर बसतां येते. त्याचा वार्षिक तनखा ९,००० पौंड आहे. ‘ डॉमन-माइट ’ नांवाचा एक चित्ता आहे. ह्या महाराजांना सिने-कॅमेऱ्या-समोर गुरगुरण्यासाठी आणि गर्जना करण्यासाठी दर दिवसाला ४१ पौंड मिळतात. ‘ स्नूकमस् ’ नांवाच्या अस्वलाला दरवर्षी १७,५०० पौंड वेतन मिळतें. एकमेकांशीं मुष्टियुद्ध खेळणाऱ्या मांजरांची एक जोडी आहे. ह्या नटद्वयाची वार्षिक प्राप्ति ५,००० पौंड आहे. सिंह हा प्राणी वनराज म्हणून मानतात. हॉलिवुड-मध्येंहि चतुष्पाद नटांना मिळणाऱ्या पगाराच्या बाबतींत त्यानें पहिला नंबर ठेवला आहे. एका प्रसिद्ध फिल्म कंपनीच्या ट्रेड-मार्कमध्यें मान वळवून गर्जना करणें एवढेंच त्याचें काम आहे. ‘ सॅमसन अँड डेलिआ ’ ह्या बोलपटांत ह्या वनराजाला काम देण्यांत आलें होतें. सिनेमासृष्टींत प्रवेश केल्यापासून त्यानें १,७५,००० पौंड कमाई केली आहे. एका गजराजाला तर टेलि-व्हिजनवर काम करण्याचें भाग्य लाभलें आहे. प्रत्येक कामाच्या वेळीं त्याला १७५ पौंड मिळतात. ह्या गजराजासाठी स्वेटर तयार करण्याची विनोदी कल्पना निघाली आणि तो तयार करण्यासाठी एका अमेरिकन महिलेला मोठें बक्षिस देण्यांत आलें. अमेरिकन बोलपटसृष्टींत धुमाकूळ घालणाऱ्या ह्या नटांच्या उत्पन्नावर प्राप्तिवरील कर घेतला जातो कीं नाहीं तें माहीत नाहीं. परंतु तो आकारावयाचा झाल्यास कायदेशीर अड-चणी उपस्थित होतील ह्यांत शंका नाहीं.

---

## घाऊक मालाच्या किंमतीमधील वाढ

| | ऑगस्ट १९३९ | २०-५-५० | १९-५-५१ |
|---|---|---|---|
| | अखेरचें वर्ष=१०० | अखेरचा आठवडा | अखेरचा आठवडा |
| अन्न | १०० | ४००.९ | ४१२.८ |
| औद्योगिक कच्चा माल | १०० | ४८५.६ | ६८५.५ |
| अर्ध-पक्का माल | १०० | २७१ | ३४० |
| पक्का माल | १०० | ३४८.० | ४१०.६ |
| कारखान्यांत तयार झालेला माल | १०० | २७३ | ३०५ |
| इतर | १०० | ६४०.३ | ७२२.८ |
| सर्व प्रकारचा माल | १०० | ३९३.० | ४५६.८ |

**मॉस्कोमधील स्टुडिओला हिंदी वकिलाची भेट**—भारताचे मॉस्कोमधील वकील डॉ. राधाकृष्णन् ह्यांनीं मास्कोमधील मॉस फिल्म ह्या सिने–स्टुडिओला नुकतीच भेट दिली. त्यांनीं तीन तासपर्यंत निरीक्षण केलें. त्यावेळीं ‘ अविस्मरणीय १९१९ ’ ह्या बोलपटाचें काम चालू होतें. ह्या स्टुडिओंत ‘ बर्लिनचा पाडाव ’ व ‘ स्टॅलिनग्रॅडची लढाई ’ हे सुप्रसिद्ध चित्रपट तयार करण्यांत आलेले आहेत.


दि
युनायटेड कमर्शिअल
बँक लि.
कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :
जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| वैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतिलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :
बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.






पो. बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, पुणें.

### लक्ष्मी रोड, पुणें २.

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जें देणें, सोनें चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज, ठेवी स्वीकारल्या जातात. एक वर्ष व दोन वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

एक वर्ष मुदतीस दीड टक्का.

दोन वर्षें अगर जास्त मुदतीस दोन टक्के.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडी (सीलबंद पेट्या) चा व्यवहार सुरू आहे. सर्वांनीं त्याचा कायदा घ्यावा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

फोनः ३४५१५ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

### ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## हिंद फायनॅन्स, इंडस्ट्रीज अँड इन्व्हेस्टमेंट लिमिटेड.

इंडियन कंपनीच्या कायद्याखालीं नोंदलेली | नोंदलेलें संक्षिप्त नांव : हिंदफिन

धनवटे चेंबर्स, सीताबर्डी, नागपूर १.

विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५,००,०००

रु. ५० च्या दर्शनी किंमतीच्या १०,००० हिश्श्यांत विभागलेलें.

मुख्य उद्देशः—उद्योगधंदे व इतर कार्यांसाठीं योग्य व्याजाच्या दरांनीं आर्थिक मदत देणें. तसेंच सोनें, चांदी व इतर मौल्यवान धातू व जवाहीर यांचे दागदागिने तयार करणें, विकणें, व गहाण ठेवून घेणें. घरें बांधण्यासाठीं अथवा खरेदी करण्यासाठीं लांब मुदतीची कर्जें देणें, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट बांधून अथवा भाड्यानें घेऊन, लोकांच्या मौल्यवान वस्तू ठेवून घेणें. लहान प्रमाणावर चालवतां येण्यासारखे धंदे स्थापन करणें, वगैरे वगैरे.

अध्यक्षः—श्रीमंत पूर्णचंद्रराव गोपाळराव बुटी.

श्री. गो. आ. भोंसुले, बी. कॉम्., सेवानिवृत्त मॅनेजर, सी. पी. ॲण्ड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.
श्री. गो. रा. श्रोती, एम्. ए.
} भोंसुले श्रोती कं. मॅनेजिंग एजन्सीचे भागीदार

हिस्सेदारांच्या ठेवी अत्यंत आकर्षक दरानें घेतल्या जातील.

गरजू हिस्सेदारांना तारण घेऊन सोईवार अटींवर कर्ज दिलें जाईल.

कंपनीचे हिस्से लवकर खरेदी करून कंपनीकडून मिळणारे अनेक फायदे मिळवा. अर्जाचे फॉर्म व त्रोटक माहितीपत्रक मागवून घ्या. हिस्से विक्रीसाठीं सन्मान्य, अनुभवी व वजनदार एजंट पाहिजेत.

—सर्व प्रांतांतील— सुती–गरम–रेशमी —खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२९१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाविवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.